# प्रसिध्दीपत्रक

दि.२२/१२/२०२३

कृषी विभागाच्या अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील कृषी सहाय्यकांची रिक्त पदे कृषी सेवक म्हणून निश्चित वेतनावर भरणेसंदर्भातील सरळसेवा पेसा व नॉन पेसा पदभरतीसाठीची जाहिरात दि.११.०८.२०२३ ते दि.१४.०८.२०२३ या कालावधीत विभाग स्तरावरुन प्रसिध्द करण्यात आल्या. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दि.१४.०९.२०२३ ते दि.०३.१०.२०२३ या कालावधीत इच्छुक उमेदवारांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

त्यानुषंगाने या प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कृषी सेवक पदभरती संदर्भातील ऑनलाईन परीक्षा आय.बी.पी.एस कंपनीमार्फत दि.१६ व १९ जानेवारी, २०२४ रोजी राबविण्यात येणार आहे. तसेच शासन पत्र दि.१८ ऑक्टोबर,२०२३ अन्वये पेसा क्षेत्रातील पदभरतीस निर्बंध असल्याने फक्त नॉन - पेसा क्षेत्रातील रिक्त पदांसाठी पदभरतीची कार्यवाही करण्यात येणार आहे. याची कृपया नोंद घ्यावी. परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र यथावकाश आय.बी.पी.एस संस्थेकडून संबंधितांस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

RJadhav 22/12/23

(राजेश जाधव)
कृषी सहसंचालक (आस्थापना),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे